# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे - ४११००७.

डॉ. शाकेरा इनामदार
एम्.एस्सी.,पी.एच्.डी
कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र.: ०२०-२५६९७३४१
२५६०११५३, २५६०११६०
फॅक्स क्र.: ०२०-२५६९७३४१
मोबाईल : ९८२२७०७०६१

संदर्भ क्र. रासेयो/१०६९/२०११ दि. १ डिसेंबर २०११

*प्रति*
*मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी*
*रासेयो संलग्नित महाविद्यालये*
*पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा*

विषय: जागतिक एड्स दिनानिमित्त महाविद्यालयात कार्यक्रम राबविणेबाबत...

महोदय/महोदया,

पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, जिल्हाधिकारी व जिल्हा एड्स नियंत्रण समिती विभागाच्या वतीने पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयातील रासेयो महाविद्यालयांमध्ये 'दि. १ डिसेंबर' या जागतिक एड्स दिनानिमित्त १ ते ७ डिसेंबर २०११ या सप्ताहात जागतिक एड्स सप्ताह साजरा करावयाचा आहे. या सप्ताहामध्ये आपण आपल्या महाविद्यालयांमध्ये सोबत दिलेल्या सूचनेनुसार रॅली, व्याख्याने, निबंध, वक्तृत्व, पोस्टर पेंटींग स्पर्धा इ. कार्यक्रम राबवावेत.

सोबत : संबधित सूचना व जागतिक एड्स दिन–शपथ

कळावे, धन्यवाद!

आपली विश्वासू

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना

Website : http://www.unipune.ac.in/nss
email : nss@unipune.ac.in

जागतिक एड्स दिन
२०११

जागतिक एड्स दिनाच्या निमित्ताने आयोजन रॅलीच्या सुरवातीस घ्यावयाच्या शपथेचा मसुदा

## जागतिक एड्स दिन - शपथ

- आम्ही आरोग्यपूर्ण जीवन जगू आणि माझे आणि माझ्या जवळच्या सर्वांचे एच आय व्ही पासून संरक्षण करु.
- एच आय व्ही सह जगणा-या व्यक्तीची काळजी घेऊ, त्यांना मदतीचा हात देऊ, तसेच त्यांच्या कुटूंबीयांना सुध्दा मदत करु.
- कोणतीही एच आय व्ही सह जगणारी व्यक्ती कामाच्या ठिकाणी, शाळेत, महाविद्यालयात, रुग्णालयात आढळल्यास त्याला कलंकीत समजून भेदभाव करणार नाही यासाठी माझ्या सहवासातील इतर व्यक्तींना एच आय व्ही संबधीत माहिती देण्यास मदत करीन.
- कोणतीही एच आय व्ही सह जगणारी व्यक्ती मानवाधिकारापासून वंचित राहणार नाही याची काळजी घेईन.

================

जागतिक एड्स दिन
२०११

## पार्श्वभूमी

जागतिक एड्स दिन २०११ चे घोषवाक्य "Getting to Zero"

"शून्य गाठायचा आहे"

म्हणजे,

१. यापुढे नवीन एच आय व्ही संसर्ग होऊ दयायचा नाही

२. कलंक भेदभाव शून्यावर आणणे

३. एड्सने होणा-या मृत्यूंचे प्रमाण शून्यावर आणणे

वरील शून्य गाठण्याची उदिदष्टे साध्य करण्यासाठी वैयक्तिक, सामाजिक व सरकारी पातळीवर जबाबदारी घेवून व जागरुक राहून सातत्याने खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१. त्यामध्ये नवीन एच आय व्ही संसर्ग टाळण्यासाठी सुरक्षित लैंगिक सबंधावर अधिकाधिक भर देणे महत्वाचे आहे व त्याच बरोबर वेगवेगळया माध्यमांचा या प्रकारचे संदेश देण्यासाठी फार जाणीवपूर्वक वापर करणे गरजेचे आहे.

२. एच आय व्ही संसर्गित व्यक्तिंबददल समाजामध्ये असणारी कलंक व भेदभावाची भावना शून्यावर आणण्यासाठी अशा व्यक्तिंना स्विकारुन त्यांना समानतेची वागणूक देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

३. एड्सने होणारे मृत्यू शून्यावर आणण्यासाठी सर्व एच आय व्ही संसर्गित व्यक्तिंना औषधोपचार उपलब्ध व्हावा यासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.